## खिडकीची ग्रील कापून 5 लाखांची चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 23 ) –** एका फर्निचर व्यावसायिकाच्या घराला लक्ष्य करीत खिडकीचे ग्रील कापून चोरांनी सोन्याचे दागिने व रोख असा एकूण पाच लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना 13 सप्टेंबर ते 23 सप्टेंबर दरम्यान घडली. भोगीलाल प्रेमदास कर्मा (वय 50) यांच्या फिर्यादीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. साईनगरातील मुकबधीर विद्यालय मार्गावरील रहिवासी भोगीलाल कर्मा हे 13 सप्टेंबर रोजी दुपारी 2.30 वाजता कुटुंबासह बाहेरगाव येथे गेले होते.

यावेळी त्यांनी घराला कुलूप लावले होते. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी खिडकीचे ग्रील कापून घरात प्रवेश केला व बेडरूममध्ये ठेवलेले कपाट फोडून दागिने व रोख असा एकूण 4 लाख 90 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. 23 सप्टेंबर रोजी सकाळी ते घरी आले असता घरातील बेडरूममधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यानंतर भोगीलाल कर्मा यांच्या फिर्यादीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# आठवड्याभरासाठी जाणारे कायमचे गेले!



## आपल्या कुटूंबाची ती भेट ठरली अखेरची

*महासागर प्रतिनिधी*

***अचलपूर/चिखलदरा/धारणी ( दि.23 )–* *मेळघाटातील दुर्गम भागात आरोग्य, शिक्षण व इतर सेवा देणारे शासकीय कर्मचारी शनिवारी आपल्या घरी, आपल्या कुटूंबात जातात आणि सोमवारी कार्यालयीन वेळेत परत आठवड्याभरासाठी शासकीय सेवेत रुजू होतात. सोमवार( दि.23 ) रोजी सेमाडोहनजिक झालेल्या बस अपघातात मृत्यूमुखी पडलेल्याची कुटूंबासमवेत झालेली ही भेट अखेरची ठरली. आठवड्याभराकरिता आपल्या कर्तव्यावर जाणारे कायमचे निघून गेले. कुटूंबियांच्या शोक, विलाप पाहून घटनास्थळावरील व अचलपूर उपजिल्हा रुग्णालय परिसरात उपस्थित नागरिकांचे काळीजही पिळून निघाले. जखमींच्या आरोळ्या आणि रुग्णवाहिकेच्या सायरनने रुग्णालय परिसर हादरुन गेला होता.*

खासगी बस पुलावरुन नाल्यात कोसळल्याने धारणीतील दोन महिला डॉक्टरसह चौघांचा मृत्यू झाला, तर 32 प्रवासी गंभीर जखमी झाले. यामधील 7 प्रवाश्यांची प्रकृती चिंताजनक आहे. ही घटना सोमवारी(दि.23) सकाळी 8.30 ते 9 वाजताच्या सुमारास चिखलदरा पोलीस स्टेशनअंतर्गत सेमाडोह लगतच्या कमान पूलावर घडली. मृतकांमध्ये कळमखार आरोग्य केंद्रात सामुदायीक आरोग्य अधिकारी (सीएचओ) असलेल्या डॉ.पल्लवी रमेश कदम(इंगळे)( वय 28, रा.आष्टी शहिद, वर्धा, ह.मू. श्री सिद्धेश्वर प्राईड अपार्टमेंट, जुना बायपास, अमरावती), धारणी येथील आहार तज्ञ (एचएसडी) डॉ.प्रणाली रघुनाथ इंगळे (वय 37, राधाकृष्ण मंदिराजवळ गाडगे नगर, अमरावती), धारणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयावरील सेवानिवृत्त लिपीक राजेंद्र मोतीप्रसाद पाल(वय 59 भोकरबर्डी, ह.मू.तलई कॅम्प,धारणी), फुलवती राजु काजले(वय 40, रा.रोहिणीखेडा, ता.दामजीपूरा, जि.बैतुल म.प्र) यांचा समावेश आहे.







## 14 जखमी अमरावती रेफर

अचलपूर रुग्णालयात आणण्यात आलेल्या 14 जखमींना अमरावती रेफर करण्यात आले, ज्यामधील 7 लोकांना खासगी आणि इतर 7 लोकांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. विशाल ना.हरणे(वय 45 रा.परतवाडा), काली पी.मावस्कर (वय 25, रा.धारणमहू), नारायण ओ.पुरी (वय 60रा.परतवाडा), गायत्री पि.मावस्कर(70, रा.धारणमहू), सुधीर भा.कोडमे(वय 40 विरतानाजी नगर, अमरावती.), आसीम हसन गवळी (वय12, रा.खंडवा), बस चालक अमरसिंग पवार (वय 45 मोरगड म.प्र), राधाबाई बेठे (वय 40 रोहणीखेडा), पिरमू भै.मावस्कर (वय 28, रा.धारणमहू), मनोहर सि.पवार(वय 45, रा.कांडली परतवाडा), राजू दिनकर (वय 22 रा.रोहिणीखेडा), मिर्झा हबीब बेग (वय 57, रफत कॉलनी, अमरावती), आलीया रुफत मो इफ्तेखारोद्दीन (वय 41,अरफात कॉलनी, अमरावती), दादाराव कुंजाम (वय 55,रा.अचलपूर) असे रेफर करण्यात आलेल्या जखमींचे नावे आहेत.

## पंचर टायर आणि चालकाची घाई जीवावर बेतली

महाराष्ट्र ते मध्यप्रदेश चालणाऱ्या या खासगी बस एका दिवसात ये-जा करण्याकरिता वेगाने बस पळवितात. सोमवारी(दि.23) चावला कंपनीची एमपी 12/ पी 1555 या क्रमांकाची ही बस 48 हून अधिक प्रवासी घेवून आपल्या नियोजित वेळेत अमरावतीहून परतवाडा मार्गे धारणीकडे निघाली. मात्र साडे सात वाजताच्या सुमारास घटांगमध्ये या बसच्या मागिल चाक पंचर झाले. त्यामूळे चालक व वाहकांनी आपल्याकडील स्टेपनी लावली. स्टेपनी लावण्यात वेळ निघून गेल्याने चालक अमरसिंग यशवंत पवार( वय 45, रा.मोरगड, म.प्र) याने बस वेगाने हाकणे सुरु केले. नजरेसमोर वळणावर ब्रिटीश कालीन विना कठळ्यांचा पुल असतानाही त्याने बसच्या वेगावर नियंत्रण मिळविले नाही. ज्यामुळे बसचा मागचा भाग पुलाच्या खाली गेला आणि बस चालकाच्या बाजूने 20 ते 24 फुट नाल्यात खडकावर पडली. यामध्ये चालकाच्या बाजूने बसलेल्या प्रवाशांच्या डोक्याला दगडाचा मार लागला यामध्ये चार प्रवासी ठार झाले आणि 35 प्रवाशी जखमी झाले.



### मागच्या बाजूला बस उसळली



मी मागे ठेवलेल्या पंचर टायरवर बसून होतो. बसचा वेग खूप होता. अचानक बस मागील बाजूला उसळली, त्यानंतर काय झाले ते कळलेच नाही. या अपघातात माझे दोन्ही पाय जखमी असून बहुतांश दात पडले.

**सुरज जैस्वाल, जखमी प्रवासी रा.शिरपूर**



मी धारणी तालुक्यातील बैरागड येथे शिक्षक आहे, त्यामूळे माझे या बसने नेहमीचेच जाणे-येणे आहे. त्यामूळे नेहमी अपडाऊन करणारे चेहरे या बसमध्ये होते. यातील तिन्ही मृतकांना मी ओळखतो. मी सकाळी 7 वाजता परतवाडा येथून बसमध्ये बसलो. घटांगमध्ये बस पंचर झाली, स्टेपनी लावून चालक वेगाने बस हाकत होता. मी चालकाच्या बाजूने मागच्या सीटवर होतो. अचानक बस पुलाखाली कोसळली मी कसातरी बसमधून बाहेर आलो आणि त्यानंतर चक्कर येवून कोसळलो. मला डोक्याला व हाताला मार आहे.

**शेख मो.शेख अजिज, जखमी प्रवासी, रा.परतवाडा**

## 2 महिन्यात मोडला संसाराचा डाव

मृतकांमधील कळमखार आरोग्य केंद्रात सामुदायीक आरोग्य अधिकारी (सीएचओ) असलेल्या डॉ.पल्लवी रमेश कदम (वय 28, रा.आष्टी शहिद, वर्धा) यांचा दोन महिन्यांपुर्वीच अमरावतीमधील श्री सिद्धेश्वर प्राईड अपार्टमेंट सामरा नगर येथे राहणाऱ्या राहूल इंगोले यांच्याशी 12 जुलै 2024 रोजी विवाह झाला होता.



धारणी तालुक्यातील कळमखार आरोग्य केंद्राअंतर्गत चिचखेडा आरोग्य उपकेंद्रावर त्या एकात्मिक आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. शनिवारी सुटीच्या दिवशी आठवड्यातून एक दिवस त्या अमरावतीला आपल्या सासरी यायच्या आणि सोमवारी परत आपल्या कर्तव्याकरिता धारणीला निघून जात होत्या. नेहमीप्रमाणे पती राहूल यांनी सकाळी 6 वाजता पत्नी डॉ.पल्लवी यांना वेळेवर पोहोचणाऱ्या चावला बसमध्ये बसून दिले. त्यानंतर अवघ्या दोन तासातच या बसचा अपघात झाल्याची माहिती त्यांना मिळाली. सुरुवातीला या अपघातात कुणी दगावले नसल्याची माहिती दिलासादायक होती, परंतू काही वेळातच आपल्या संसाराचा डाव अर्ध्यावर मोडल्याचे राहूल यांना कळले. या घटनेमूळे संपुर्ण अमरावती जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

## भावाची भेट ठरली अखेरची

धारणी उपजिल्हा रुग्णालय येथील आहार तज्ञ (एचएसडी) डॉ.प्रणाली रघुनाथ इंगळे (वय 37) या परतवाडा येथे एकट्याच राहत होत्या. त्यांचा भाऊ हा मुंबईला एका खाजगी कंपनीत कार्यरत आहे. भाऊ आपल्या अमरावतीमध्ये गाडगे नगर येथे आईकडे आल्याने डॉ.प्रणाली ह्या त्याला भेटायला गेल्या होत्या. दोन दिवस आई आणि भावासोबत राहील्यावर भाऊ मुंबईला आणि डॉ.प्रणाली या धारणीकडे निघाल्या, परंतू बहिण, भावाची ही भेट अखेरची ठरली. अपघातात डॉ.प्रणाली यांचा मृत्यू झाला.



## अपघातग्रस्त क्रेनवर कार धडकली



या अपघातानंतर सायंकाळी 4 वाजताच्या सुमारास दरीतील ट्रॅव्हल्स बसला बाहेर काढण्याचे काम सुरू करण्यात आले होते. परंतू बस क्रेनद्वारे काढत असतानाच अचानक ती क्रेनही उलटली. त्यामुळे क्रेनचेही नुकसान झाले आहे. त्यानंतर दुसरी क्रेन बोलवून बस बाहेर काढण्यात आली. परंतु यावेळ अपघातग्रस्त क्रेनवर एक कार धडकल्याने अमरावती-धारणी मार्ग रात्री उशिरापर्यंत बंद होता.

## पोलिस, आरोग्य यंत्रणेची धावाधाव

या घटनेच्या माहितीवरून चिखलदऱ्याचे पोलीस निरीक्षक आनंद पिदुरकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना सेमाडोह प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविले. धारणी येथील उपविभागीय अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर व तहसीलदार प्रदिप शेवाळे यांनीही तत्काळ सहा रुग्णवाहिकेंना घटनास्थळी बोलाविले. सेमाडोह येथील डॉ.सुष्मा इंगोले यांनी जखमींवर तत्काळ उपचार केले. या घटनेच्या अनुषंगाने चिखलदरा पोलिसांनी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरु केली होती. पोलिस चालकाचा शोध घेत आहे.

## चालकाच्या खिश्यात आढळली दारुची बॉटल

अमरावती निघालेली ही बस सकाळी 10.15 वाजता देडतलई पोहोचली की, त्यांना पुढील प्रवासाचे प्रवासी मिळतात. कारण देडतलई येथे नम्बरनुसार ट्रॅव्हल्स सोडली जाते. या बसला उशिर झाल्यास, त्यांना प्रवाशी गमावावे लागते. त्यामुळे वेळ कव्हर करण्याच्या नादात चालकाने अती वेगाने वाहन चालविल्याने हा अपघात घडल्याची माहिती सुत्रांनी दिली. विशेष म्हणजे चालकाजवळ दारुची बॉटल आढळून आल्याची माहिती पुढे येत आहे.

## अचलपूर रुग्णालयात दाखल जखमी

शे. मोहम्मद मो.अजीज (वय 38, अचलपूर), गजानन दा. मावस्कर (वय 36 रा.धारणी), देविदास पु.राठोड (वय 49, रा.अमरावती), भुजंगलाल मा.चौहाण (वय 30, रा.मध्यप्रदेश), विष्णु मावस्कर (वय 24, रा.धारणी), जगन दा.मावस्कर (वय 38, रा.धारणी), प्रविण उ.अधमकर(वय 56, अमरावती), सुरज जैस्वाल (वय 30, रा.धारणी), मुन्नीबाई ज.गवळी ( वय 60, रा. खंडवा), मुकेश सुर्यवंशी(वय 30 रा.बैतुल म.प्र.), मोहन व.वानखडे(वय 60, रा.दवाली शेखपूरा धारणी), दिलीप स.नैताम (वय 44 रा.अमरावती) हे जखमी अचलपूर उपजिला रूग्णालयात उपचार घेत आहे.

## खासदार, आमदार जखमींच्या भेटीला

या घटनेच्या माहितीवरून खासदार बळवंत वानखडे यांनी जखमींची माहिती जाणून घेत रुग्णवाहिका, आरोग्य विभाग व पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्याना जखमींच्या प्रकृतीकडे लक्ष देण्याच्या सूचना केल्या. तसेच मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांनी घटनास्थळी भेट दिली. धारणी येथील भाजपा पदाधिकारी ज्योती सोळंके(माळवे) या अचलपूर रुग्णालयात पोहोचल्या होत्या. त्यांनी सीएस सोबत बोलून तातडीने इलाज करण्याचे निर्देश दिलेत. आमदार बच्चु कडू यांनीही अचलपूर येथील रुग्णालयात जाऊन रुग्णांची चौकशी केली.



## सेमाडोह येथील सामाजिक कार्यकर्तेही धावले मदतीसाठी

कामगार युनियनचे अध्यक्ष रमेश तोटे यांनी सेमाडोह येथील कामगार संघटनेच्या कार्यकर्त्यांना फोन करुन तत्काळ मदतीचे कार्य सुरु केले. सेमाडोह येथिल सामाजिक कार्यकर्ते विलास बोरकर, गोलू मुंडे यांच्यासह काही युवकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बसच्या काचा तोडून जखमी प्रवाशांना बाहेर काढले. तसेच सामाजिक कार्यकर्ता राजेश सेमलकर, गणेश आलोकार, रामेश्वर बरडे, लक्ष्मण यादव, गणेश दाकडे, सुरेश कासदेकर, रामप्रसाद मावसकर, रमेश मावसकर, भोगीलाल मावसकर, यांच्यासह सेमाडोह गावकरी, कामगार सामाजिक कार्यकर्ता यांनी अपघातग्रस्तांना मदत केली.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# देयके निघतात, सुविधा मात्र कागदावर

## लाखों रुपयांची विहीर भग्नावस्थेत ■ रिमांड होमपेक्षा कमी नाही जारीदा 'आश्रम' शाळा



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.23 )–** चिखलदरा तालुक्यातील जारीदा आश्रमशाळा विद्यार्थ्यांना रिमांड होमपेक्षा कमी नाही. सुविधा न देता येथील विद्यार्थ्यांचा मानसिक छळ केला जात असल्याचे दिसत आहे.

विद्यार्थ्यांना सर्व ऋतुमध्ये गर्मीमध्ये झोपावे लागते, हिवाळ्यातही तलावाच्या थंड पाण्याने अंघोळ करावी लागते, लाखो रुपये खर्च करुन बनविण्यात आलेली विहीर भग्नावस्थेत टाकून येथील विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याकरिता सार्वजनिक विहीरीवरुन पाणीपुरवठा केला जात आहे.

त्यामूळे दुषीत पाणी पिवून वारंवार आजारी पडावे लागते, हा प्रकार मानसिक छळापेक्षा कमी नाही.

वसतीगृहातील विद्यार्थ्यांकरीता असणाऱ्या अनेक सुविधा येथील मुख्याध्यापकांनी भंगारात काढलेल्या आहे. शाळा परिसरात अनेक ठिकाणी नळ तुटलेले आहेत. नळाच्या पाईपलाईन फुटलेल्या आहे. कित्येक ठिकाणी पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात होत आहे. वर्ग खोल्यांमध्ये तर लाईट व्यवस्था. पंखे बंद अवस्थेत आहे. विजेच्या तारा व स्विच बोर्ड अनेक ठिकाणी तुटलेले आहेत. जे विद्यार्थ्यांच्या जीवावर उठले आहेत. परिसरात मोठ्याप्रमाणात गवत वाढले आहे, ज्यामध्ये सरपटणाऱ्या प्राण्यांचा मोठ्याप्रमाणात वावर असतो. येथील किरकोळ कामकाजासाठी लाखोंची देयके प्रकल्प कार्यालयाकडून अदा केली जात आहे. जी कामे केवळ कागदोपत्री दिसून येतात. दुरुस्तीच्या नावाखाली येथे आर्थिक अनियमितता केली जात असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### पीएमश्री चे साहित्य धुळखात

पीएम श्री योजने अंतर्गत ही शाळा तालुक्यामधून एकमेव निवड झालेली शाळा आहे. मात्र शाळेमध्ये या योजनेअंतर्गत आलेले साहित्य तसेच खरेदी केलेले साहित्य धुळखात पडलेले आहे. याअंतर्गत शिक्षकांना विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याकरिता 22 टॅब आले आहे, जे मुख्याध्यापकांनी कुलूपबंद करुन ठेवले. याचा शिक्षक व विद्यार्थ्यांना कोणताही उपयोग होताना दिसून येत नाही. शासन लाखो रुपयांचा निधी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी खर्च करीत असताना मेळघाटात अजूनही काही मुख्याध्यापकांच्या नाकर्तेपणामुळे शाळा भंगार झालेल्या आहेत. या योजनेअंतर्गत केलेल्या साहित्य खरेदीमध्ये सुद्धा लाखोंचा भ्रष्टाचार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून मोठ्या प्रमाणात दुरुस्ती तसेच इतर कामांकरिता शाळेकरीता निधी उपलब्ध करून दिला जात असतानाही जर सुविधांची कमतरताच असेल तर कुठेतरी पाणी मुरतंय यात दुमत नसावे.

### शिपायांची कामे मुख्याध्यापकाकडून

मुख्याध्यापकासारख्या जबाबदार व्यक्तीने मुख्यालयी राहून शाळेचे कामकाज पाहणे आवश्यक असताना मुख्याध्यापक जास्तवेळ घरुनच कारभार चालविताना दिसतात. मुख्याध्यापकांनी महत्त्वाच्या सभेकरिताच बाहेर जाणे आवश्यक असताना, जी कामे शिपाई करू शकतील अशा कामांकरिता मुख्याध्यापक स्वत: दौरे घेतात व वारंवार स्वगृही जातात. पगार, देयके तसेच किरकोळ कामकाजाकरीता शाळेमध्ये मोठे मनुष्यबळ उपलब्ध असतानाही या दौऱ्या निमित्ताने मुख्याध्यापक घरी राहण्यातच धन्यता मानतात. यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचेही नियंत्रण नाही असे दिसून येते.

# अप्पर वर्धा धरणाचे 9 गेट उघडले

## वर्धा नदीच्या पात्रात 514 घन.मी.से. ने पाण्याचा विसर्ग

### नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.23 ) –** पश्चिम विदर्भातील सर्वात मोठ्या अप्पर वर्धा धरणाचे 13 पैकी 9 गेट रविवारला रात्री 8 वा. 235 सेंटिमीटरने उघडण्यात आली. त्यामधून 194 घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे. वर्धा नदीचे पाणलोट क्षेत्र हे मध्यप्रदेशात आहे. या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळे मध्य प्रदेशातील जाम आणि माडू नदीला आलेल्या पुर आला असून यामुळे अप्पर वर्धाच्या पातळीत वाढ झाल्याने हा विसर्ग करण्यात येत आहे. जिल्ह्यासाठी वरदायिनी असलेल्या अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या संततधार पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे अप्पर वर्धा धरणाच्या जलसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. ही बाब लक्षात घेऊन रविवारला रात्री धरणाची 9 दारे उघडण्यात आली. उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रामधे जोरदार पाऊस सुरु झाल्यामुळे जलाशय पातळी 342 मी. (100त्र) पर्यंत गेली होती. ही पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी रविवारला 8 वा. पासून वर्धा नदी पात्रात विसर्ग 205 घन. मी/से. वरून वाढवून आला 514 चन. मी/से. एवढा करण्यात आहे. तसेच सध्या स्थितीत दरवाजेप्रत्येक 35 से.मी. मधून एकूण विसर्ग 514 घन. मी/से पाणी वर्धा नदी पात्रात सोडण्यात येत आहे.

### 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत अंबिकानगर येथे वृक्षारोपण

**अमरावती –** स्वच्छता ही सेवा 2024 अभियानांतर्गत अमरावती महानगरपालिका मध्य झोन क्र. 2 राजापेठच्या वतीने 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत अंबिकानगर येथील मनपा शाळा क्र. 16 जवळील मैदानामध्ये वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. पर्यावरण संवर्धनसोबतच मातांच्या सन्मानार्थ झाडे लावणे ह्या उद्दिष्टाने आयोजित या कार्यक्रमात जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, डॉ. सरोज पिल्लेवान, हर्षा गणवीर, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी, परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविले. कार्यक्रमाचे उद्घाटन साहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर यांच्या हस्ते करण्यात आले. मातांच्या नावाने झाडे लावण्याचे भावनिक महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व स्पष्ट करीत परिसरातील नागरिकांना झाडांची देखभाल करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# बँक खात्यातून उडविले 2.30 लाख

## ना ओटीपी दिला, ना कुठली माहिती दिली




**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.23 )–** तालुक्यातील वडूर येथील रहिवासी असलेल्या 36 वर्षीय तरुणाच्या मोबाईलवर पाच वेळा ओटीपी आला; मात्र त्या तरुणाने त्याला कोणताही प्रतिसाद दिला नाही. असे असतानाही अज्ञात व्यक्तीने त्यांच्या बँक खात्यातून 2 लाख 30 हजार रुपये ऑनलाइन ट्रान्सफर केले. ही घटना 18 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7.30 वाजता घडली. याप्रकरणी सचिन अरविंद साळव (36) यांच्या फिर्यादीवरून चांदूरबाजार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सचिन साळव यांची तळवेल येथील बँक ऑफ इंडिया शाखेत दोन खाती आहेत. 18 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7.30 च्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर एक ओटीपी आला. यानंतर सलग चार वेळा ओटीपी आला.

मात्र सचिन साळव यांनी शहाणपणा दाखवत या ओटीपी क्रमांकाला कोणताही प्रतिसाद दिला नाही. मात्र असे असतानाही अज्ञात आरोपीने त्यांच्या बँक त्यातून 2 लाख 30 हजार रुपये ऑनलाइन दुसर्या खात्यात जमा केले. याप्रकरणी सचिनने 22 सप्टेंबर रोजी चांदूर बाजार पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम 318 अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



अमरावती- रश्मी उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मातोश्री वर जाऊन शिवसेना जिल्हा प्रमुख सुनील खराटे यांनी शुभेच्छा दिल्या.

# धक्का लागल्याच्या कारणावरून राडा

## पहेलवान बाबा दर्गाजवळची घटना



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 23 ) –** नाचत असताना धक्का लागल्याने तीन तरुणांवर रॉड आणि चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची घटना 21 सप्टेंबर रोजी रात्री 9.30 वाजता परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फॉरेस्ट रोडवरील पहेलवानबाबा दर्ग्याजवळ घडली. जखमी शेख अमीन शेख अमीम (20, कालीमाता नगर, टिंबर रोड, परतवाडा) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी मुद्दसिर खान जमील खान उर्फ गोलू, साहिल जमील खान, राजा, रेहान पटवारी (सर्व रा. मुघलाईपुरा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पहेलवान बाबा दर्ग्याजवळ कार्यक्रम सुरू असताना काही तरुण नाचत होते. यावेळी शेख अमीन शेख अमीम नाचत असताना मुद्दसिर खान जमील खान उर्फ गोलू यांना धक्का लागला. यावरून वाद होऊन मुद्दसिर खान जमील खान उर्फ गोलू, साहिल जमील खान, राजा आणि रेहान यांनी शेख अमीन यांच्यावर लोखंडी रॉड व चाकूने हल्ला केला. तसेच शेख अमीनचे मित्र व भाऊ त्याला वाचवण्यासाठी आले असता त्यांच्यावरही लोखंडी रॉड व चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला. त्यामुळे तिघेही जखमी झाले. शेख अमीन यांच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी आरोपी मुद्दसिर खान जमील खान उर्फ गोलू, साहिल जमील खान, राजा आणि रेहान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# तरुणाने महिलेचा गळा चिरून केली हत्या

## आरोपीनेही घेतले विष

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड ( दि.23 )–** तालुक्यातील एकदरा गावात शनिवारी पैशाच्या वादातून 30 वर्षीय महिलेचा प्रियकराने चाकूने गळा चिरून खून केला. त्यानंतर आरोपीनेही विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांना गंभीर अवस्थेत अमरावती जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कमल सागर कोल्हे (30) असे मृत महिलेचे नाव आहे. तर वसंत नथ्थू मुंगभाते (38, रा. नागपूर जिल्ह्यातील तरोडा भारशिंगी) असे आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पतीच्या अत्याचाराला कंटाळलेली मयत महिला तिच्या 9 वर्षाच्या मुलासह माहेरी राहत होती. गेल्या एक वर्षापासून ती विवाहित आरोपी वसंतसोबत जेवण बनवण्यासाठी जात होती. यादरम्यान दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. गेल्या एक महिन्यापासून ते दोघे एकाच घरात एकत्र राहत होते. कमल कोल्हे यांनी वसंत यांच्या आजारी मुलाच्या उपचारासाठी बचत गटातून पैसे काढले होते. हे पैसे परत देण्याची वेळ आल्यावर कमल ही वसंतकडे वारंवार पैशांची मागणी करत होती. शुक्रवारी रात्रीही याच कारणावरून दोघांमध्ये वाद होऊन वसंतने तिचा गळा चिरून खून केला. रात्री 1 वाजता मृत महिलेचा मुलगा दीपक झोपेतून उठला असता त्याला त्याची आई बेडवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली. त्याने मावशीला फोन करून घटनेची माहिती दिली. बेडवर रक्ताने माखलेला चाकूही पडला होता. दीपकने तत्काळ शेजाऱ्यांना उठवून याबाबत माहिती दिली. नंतर पोलिसांना कळविण्यात आले. वरुडचे ठाणेदार अवतारसिंग चव्हाण हे तत्काळ त्यांच्या पथकासह घटनास्थळ गाठले. पोलिसांनी रक्ताने माखलेला चाकू जप्त केला असून आरोपीचा शोध सुरू केला आहे. आरोपी वसंत मुनगनाटे याच्या मोबाईल लोकेशनच्या आधारे पोलिसांचे पथक त्याच्या तरोडा येथील घरी पोहोचले, त्यावेळी वसंत हा विष पिवून बेशुद्ध अवस्थेत घरासमोर पडला होता. पोलिसांनी त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले. कृष्णा डांगे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी वसंतविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# युवकावर चाकूने खुनी हल्ला



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.23 ) –** दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने तिघांनी तरुणावर चाकूने हल्ला केल्याची घटना 22 सप्टेंबर रोजी रात्री 9.30 वाजता उत्तम नगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज रोडवर घडली होती. जखमीच्या आईच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी सुमित उर्फ चुहा, रितेश आणि लकी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी तक्रारदार महिलेचा मुलगा पैसे आणायचे आहे, असे सांगून त्याच्या शेजारच्या दोन मित्रांसह उत्तम नगर येथे गेला. तर उत्तम नगर येथून परतत असताना डॉ. आंबेडकर कॉलेज रोडवर तीन तरुण उभे होते.

त्याने तिघांनाही थांबवून दारू पिण्यासाठी पैसे मागितले. महिलेच्या मुलाने पैसे न दिल्याने आरोपीने शिवीगाळ सुरू केली. आरोपी लकीने चाकू काढून महिलेच्या मुलाच्या पोटात वार केला. त्यानंतर आरोपी सुमित उर्फ चुहा याने त्याला लोखंडी रॉडने मारहाण केली.

जखमींसोबत असलेल्या प्रेम काळे यांनी तत्काळ ऑटोचालकाला बोलावले. त्यानंतर जखमीला ऑटोमध्ये बसवून उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमीच्या आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी सुमित उर्फ चुहा, रितेश आणि लकी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# आश्रमशाळेच्या स्वयंपाकी पदासाठी मुख्याध्यापकाने दोन लाख उकळले

## महिलेकडून तक्रार दाखल | 'प्रश्नचिन्ह'च्या तत्कालीन मुख्याध्यापकाकडून बनावट नियुक्तिपत्र

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर, ( दि. 23 ) –** तालुक्यातील मंगरूळ चव्हाळा येथील 'प्रश्नचिन्ह' आश्रमशाळेत स्वयंपाकी पदावर नोकरी लावून देण्यासाठी तत्कालीन मुख्याध्यापकाने दोन लाख रुपये उकळले. त्याने एकूण सात लाखांची मागणी केली होती, अशी तक्रार मंगरूळ चव्हाळा पोलिस ठाण्यात महिलेकडून नोंदविण्यात आली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस सूत्रांनुसार, वहिता नूरदास भोसले (29, रा. पारधी बेडा, मंगरूळ चव्हाळा) असे तक्रारदाराचे, तर प्रशांत बबन गोरामण (32) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तत्कालीन मुख्याध्यापकाचे नाव आहे. 1 सप्टेंबर 2022 रोजी वहिता भोसले यांना मुख्याध्यापक प्रशांत गोरामण याने सात लाखांची मागणी करीत स्वयंपाकी पदावर नोकरी देण्याचे आमिष दाखविले. ही प्रचंड मोठी रक्कम असल्याने ती देऊ शकत नाही, असे म्हणताच त्याने तूर्तास दोन लाख रुपये दे , असे सांगितले. उर्वरित पाच लाख रुपये या पदाचे ॲप्रूव्हल आल्यानंतर पगारातून कापले जातील, असे स्पष्ट केले. वहिताने



दोन लाख रुपये दिल्यानंतर तिला शाळेच्या लेटर पॅडवर नियुक्तिपत्र मिळाले. तिने या पदावर कामदेखील केले. तथापि, स्वयंपाकी पदाकरिता प्रस्तावच नसल्याचे काही दिवसांनंतर तिच्या निदर्शनास आले. खोटे नियुक्तिपत्र देऊन फसवणूक केल्याचे लक्षात येताच तिने मंगरूळ चव्हाळा पोलिस ठाणे गाठले. याप्रकरणी मंगरूळ चव्हाळा पोलिसांनी 21 सप्टेंबर रोजी प्रशांत गोरामणविरुद्ध भादंविचे कलम 420, 468, 471 अन्वये गुन्हा नोंदविला. मंगरूळ चव्हाळा येथील प्रश्नचिन्ह स्कूल ही महाराष्ट्र आणि भारताच्या इतर भागांतील अनाथ आणि आदिवासी, विशेषत: फासेपारधी समाजाच्या मुलांना मोफत शिक्षण आणि निवासी सुविधा पुरवण्यासाठी समर्पित ना-नफा संस्था आहे. या वंचित मुलांना इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे दर्जेदार शालेय शिक्षण तसेच त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे ध्येय मतीन भोसले यांनी बाळगले आहे.

> प्रशांत गोरामण यांनी उदात्त विचारांनी सुरू केलेल्या कार्यावर, संस्थेवर अनेक आरोप लावले होते. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत कागदपत्रेही बनावट आढळून आली होती. त्यामुळे मार्च 2024 च्या सुमारास त्यांना बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला आहे.
>
> **मतीन भोसले,**
> **संस्थापक, प्रश्नचिन्ह**

# राज्यभरातील आरटीओ कर्मचारी उद्यापासून संपावर

## अन्यायी समायोजनाविरोधात आंदोलन




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.23 ) –** आकृतीबंधाच्या नावाखाली कर्मचाऱ्यांचे राज्यभर समायोजन व महसूल विभागात बदली करण्याचा घाट परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडून यांच्याकडून घालण्यात आला आहे. ज्याचे पडसाद संपुर्ण महाराष्ट्रातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये (आरटीओ) पहायला मिळत आहे. या अन्यायी समायोजनाविरुध्द कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे. आकृतीबंधाची पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करावी या प्रमुख मागणीसह आपल्या विविध मागण्यांच्या पुर्ततेकरिता आरटीओ विभागाच्या कर्मचाऱ्यांनी संपूर्ण राज्यभर 24 सप्टेंबर पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्धार केला आहे. त्यामूळे विविध कामांकरिता आरटीओ कार्यालयात जाणाऱ्या नागरिकांचे कामे रखडणार आहे.

> आरटीओ कर्मचारी यांची राज्याच्या परिवहन आयुक्त यांच्याशी बोलणे फिसकटल्याने व कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण न केल्याने राज्यातील आरटीओ विभागातील सर्व कर्मचारी संपावर जात आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या पुर्ण होणार नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरुच राहिल.
>
> **-अनिल मानकर, राज्य उपाध्यक्ष, मो.वा.विभाग कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य.**